**Newspaper : Saamna**

**Article date : 14th February 2018**

**Article regarding Platinum Jubilee Celebration**

# पोद्दार महाविद्यालयाचा अमृत महोत्सव!

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) – वाणिज्य शाखेतील सर्वोत्कृष्ट कॉलेजांच्या यादीत माटुंग्याच्या रा. आ. पोद्दार महाविद्यालयाचा आवर्जून उल्लेख केला जातो. नुकतीच या कॉलेजला ७५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त कॉलेजने त्यांच्या आजी–माजी विद्यार्थ्यांसोबत सेलिब्रेशन करण्याचे ठरवले आहे. येत्या १९ फेब्रुवारीला सायंकाळी ५.३० वाजता माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात यानिमित्त विशेष कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात पोद्दार कॉलेजच्या यशस्वी प्रवासावर प्रकाश टाकणारे विविध उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

**आजी–माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत १९ फेब्रुवारीला विशेष कार्यक्रम**

शिक्षण प्रसारक मंडळीने सुरू केलेल्या पोद्दार महाविद्यालयाने केवळ अव्वल दर्जाचे सीए तयार केले असे नाही तर विविध क्षेत्रांतील दिग्गज घडवण्यात हातभार लावला आहे. यात दिलीप वेंगसरकर, संजय मांजरेकर, रवी शास्त्री यांसारखे क्रिकेटमधील अव्वल मोहरे, उदय टिकेकर, आरती अंकलीकर–टिकेकर, सुरेश खरे, विजय केंकरे, तुषार दळवी, अरुण म्हात्रे यांसारखे संगीत, नाटक, सिनेमा, साहित्य अशा विविध कलाक्षेत्रातील नामवंत कलाकार आणि साहित्यिक महाराष्ट्राला दिले आहेत. पोद्दार महाविद्यालयाने शैक्षणिक संस्थांमध्ये आपले एक स्थान निर्माण केले आहे. या कार्यक्रमावेळी गेल्या ७५ वर्षांचा आढावा घेणारी 'कल आज और कल' ही स्मरणिका या वेळी प्रकाशित करण्यात येणार आहे.